# अर्थकारणास अध्यात्माची जोड देणारी 'शिवकृपा' समाजाभिमुख पतसंस्था - अविनाश धर्माधिकारी

**कोरेगाव/प्रतिनिधी**

निकोप सहकार जोपासत अर्थकारणास अध्यात्माची जोड देणारी शिवकृपा पतपेढी ही राज्यात समाजाभिमुख, आदर्श पतसंस्था ठरल्याचे गौरवोद्गार पुण्याच्या चाणक्य मंडलचे संचालक अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

शिवकृपा पतपेढीने एक हजार कोटींचा संमिश्र व्यवसाय पूर्ण केल्याच्या निमित्ताने चिंचवड (पुणे) येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजित केलेल्या आनंद सोहळ्यात धर्माधिकारी बोलत होते. सोलापूर वस्त्रोद्योग विभागाचे प्रादेशिक उपसंचालक अशोक भांडवलकर, शिवकृपाचे अध्यक्ष अविनाश भोसले, उपाध्यक्ष हणमंत गायकवाड, मानद सचिव पंढरीनाथ भोसले, संस्थापक संचालक कृष्णा शेलार, माजी अध्यक्ष चंद्रकांत वंजारी आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

धर्माधिकारी पुढे म्हणाले, जनसेवा हीच ईश्वरसेवा मानून एका विशिष्ट ध्येयाने शिवकृपा पतपेढी कार्यरत आहेत. या संस्थेतील सेवकांची विनम्रता, त्यांची कामाची पध्दत ही राज्यातील सहकाराला मार्गदर्शक असून संस्थेच्या कामातच वेगळा आनंद मानून हे सर्वजण काम करत आहेत. सहकाराचे निकष पालन, व्यवस्थापन व संचालक विश्वस्थांची ध्येयधोरणे, योगदान याशिवाय अधिकारी, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांच्या कार्याची सचोटी, शिस्त, आचारसंहिता या सर्वांच्या एकत्रीकरणामुळेच शिवकृपाची उत्कृष्टता संपूर्ण राज्यभर झाली आहे. या संस्थेने इतरांना मार्गदर्शन करावे व सहकारातील इतर पतसंस्थांनी शिवकृपाचा आदर्श दृष्टीक्षेपात ठेवून वाटचाल करावी, असे चांगले काम निर्माण केल्याचेही ते म्हणाले.

अशोक भांडवलकर म्हणाले, शिवकृपाचे युवा नेतृत्व पाहिल्यानंतर ही संस्था हायटेक होत चालल्याचे अभिमानाने नमूद करावे लागेल. नव्या वर्षात नवे संकल्प घेवून पुढे जाणारी ही संस्था निश्चित राज्यातील क्रमांक एकची संस्था ठरेल यात आता तिळमात्र शंका नाही.

अविनाश भोसले म्हणाले, सहकार चळवळीत वेगळेपण जोपासत शिवकृपाने आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. यातूनच १ हजार कोटींच्या संकल्पपूर्तीसाठी सर्वांनी योगदान दिले. या उद्दिष्टपूर्तीसाठी झटणाऱ्या शिवकृपा परिवारातील प्रत्येक घटकाच्या जीवनात सुवर्णयुग निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे सांगून येत्या काही दिवसात शिवकृपाच्या आठ शाखा जनसेवेत रूजू होत असल्याची घोषणा करून त्यासाठी नव्या नियुक्त्याही त्यांनी जाहीर केल्या. प्रारंभी मुंबई सहकार बोर्डावर संचालकपदी निवड झाल्याबद्दल संस्थेचे संस्थापक, संचालक कृष्णा शेलार, माजी अध्यक्ष चंद्रकांत वंजारी यांचा संस्था परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचा आरंभ संतोष देशमुख यांनी स्वागत व ओंकार आराधनेने केला. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पांडुरंग घाडगे यांनी अतिथींचा परिचय करून दिला.

यावेळी संस्थेचे संस्थापक, संचालक कृष्णा शेलार, माजी अध्यक्ष वसंतराव चव्हाण, भीमराव बोराडे, बाळासाहेब मोहिते, सखाराम सपकाळ, जयवंत खामकर, सोपान बोराडे, अशोक तुपे, बबन काटे यांच्यासह सर्व संचालकांनी तसेच प्रातिनिधीक स्वरूपात कर्मचारी प्रतिनिधी, ठेव संकलन प्रतिनिधींनीही मनोगत व्यक्त केले.




'शिवकृपा'च्या १ हजार कोटी संमिश्र व्यवसाय संकल्पपूर्तीच्या नामफलकाचे अनावरण करताना अविनाश धर्माधिकारी, सोबत अविनाश भोसले, हणमंत गायकवाड, पंढरीनाथ भोसले, कृष्णा शेलार, चंद्रकांत वंजारी, पांडुरंग घाडगे आदी.